145

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue – 223

# अर्थभारती

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक



Guest Editor::
Dr. Suresh B. Bijave
Principal,
Bhartiya Mahavidyalaya, Morshi
Dist.- Amarawati [M.S.] India.

Executive Editor::
Dr. Lajwanti R. Tembhurne
Head, Dept. of Economics,
Bhartiya Mahavidyalaya, Morshi
Dist.- Amarawati [M.S.] India

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
(Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 223 : विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक
Peer Reviewed Journal

ISSN : 2348-7143
February-2020

## INDEX



| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Changing Pattern and Composition of Employment and Unemployment in India | Dr. Samit Mahore, Dr. Dhiraj Kadam | 09 |
| 2 | Employment Scenario for Forthcoming 5 Years : An Outlook for India | Dr. Gajanan Patil | 15 |
| 3 | Recent Context of Current Employment Scenario in India | Dr. Raju Shrirame | 22 |
| 4 | Recent Employment Trends in India | Dr. Prashant Katole | 30 |
| 5 | विश्व व्यापार संगठन और भारत | डॉ. अर्चना जैन | 34 |
| 6 | वैश्विक मुक्त व्यापार और भारत | डॉ. प्रिती बंडे | 39 |
| 7 | सुधारोत्तर कालखंडात भारतीय श्रमशक्तीचा बदलता आकृतिबंध आणि प्रवृत्ती संदर्भ जनगणनेच्या तथ्यांचा | डॉ. धीरज कदम, डॉ. समित माहोरे | 41 |
| 8 | जागतिक मुक्त व्यापार आणि जागतिक व्यापार संघटना | प्रा. दिपक काळे | 49 |
| 9 | नियोजन जिल्ह्याचे,अभिसरण विकासाचे – अमरावती जिल्ह्याचे संदर्भात | डॉ. मधुकर ताकतोडे, डॉ. पंकज तायडे | 54 |
| 10 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश | डॉ. सुनिल शिंदे | 62 |
| 11 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश | डॉ. माणिक ठिकरे, डॉ. करमसिंग राजपुत | 68 |
| 12 | भारतातील रोजगाराचे वदलते स्वरूप | डॉ. जे. व्ही. गायकवाड | 74 |
| 13 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश | प्रा. माधुरी राखुंडे | 79 |
| 14 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यश-अपयश | श्री. सुनिल घुगल | 85 |
| 15 | जागतिक व्यापार संघटना व भारत | प्रा. गजानन जाने | 93 |
| 16 | वर्तमान काळात भारतातील रोजगाराच्या स्वरूपातील वदल | डॉ. यु. बी. सांगोळकर | 98 |
| 17 | भारतातील श्रमशक्ती व रोजगाराचे वदलते स्वरूप | डॉ. रवि सोरते | 103 |
| 18 | मुक्त व्यापार आणि जागतिक व्यापार संघटना | डॉ. महेंद्र गावंडे | 112 |
| 19 | मुक्त व्यापार आणि जागतिक व्यापार संघटना | डॉ. अविनाश निकम | 116 |
| 20 | भारतातील रोजगाराचे वदलते स्वरूप | डॉ. राजश्री रायभोग | 125 |
| 21 | जागतिक व्यापार संघटना आणि भारतातील फळ व्यापार | डॉ. निलम छंगाणी | 130 |
| 22 | ग्रामीण भागात संत्रा कलम व्यवसायामुळे रोजगाराचे वदलते स्वरूप | डॉ. प्रज्ञा निंभोरकर | 133 |
| 23 | जिल्हा नियोजन समिती : यवतमाळ जिल्हा | डॉ. सिध्दार्थ मेश्राम | 138 |
| 24 | जागतिक व्यापार संघटनेचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | प्रा. स्वप्निल बोबडे, प्रा. रविंद्र शेंडे | 142 |
| 25 | ग्रंथालयातील रोजगाराचे बदलते स्वरूप | प्रा. अरविंद पाझारे | 146 |
| 26 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश | प्रा. अंकुश तुरखडे | 150 |
| 27 | जागतिक व्यापार संघटनेच्या धोरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ. आर. जी. टाले | 155 |
| 28 | जागतिक व्यापार,संघटना आणि भारतीय शेती क्षेत्र | प्रा. दिपाली पडोळे | 160 |
| 29 | वर्तमान काळातील रोजगाराचे स्वरूप व आर्थिक सिद्धांत | डॉ. सुरेश जगताप | 162 |
| 30 | जागतिक व्यापार संघटना : भारताचे यश-अपयश | डॉ. ममता साहू | 165 |
| 31 | जागतिक व्यापार संघटनेला मुक्त व्यापार व्यवस्थेत यश-अपयश | डॉ. संजय धनवटे | 168 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 223 : विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# जागतिक व्यापार संघटनेचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

प्रा. स्वप्निल एस. बोबडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले
महाविद्यालय, बल्लारपूर
Mob.No. 9049609662

प्रा. रविंद्र बी. शेंडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
Mob.No. 9049609662
Shende.ravindra3@gmail.com

**सारांष :**

भारतासह जगातील अनेक राष्ट्रात जागतिकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यांच्या संबंधात विचारमंथन सुरू आहे. सन 1994 मध्ये ऊरूग्वे येथे राष्ट्रातील व्यापारविषयक वाटाघाटी पूर्ण झाल्यानंतर सन 1995 मध्ये जागतिक व्यापार संघटनेची (WTO) स्थापना करण्यात आली. यात भारताचा देखील समावेश होता. आचार्य विठोबा भावे यांचे 'जयजगत' हे केवळ स्वप्न राहिले नसून ते प्रत्यक्षात येत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर युनो, गॅट, नाणेनिधी, जागतिक बँक इत्यादी जागतिक संघटना स्थापन करण्यात आल्या. या सर्वांचा उद्देश जगातील विविध देशांनी कोणत्याही अडथळ्याविना विविध प्रकारचे व्यवहार एकमेकांसोबत करावेत. परिणामी जागतिकीकरण हा 20 व्या शतकाच्या अखेरीचा व 21 व्या शतकाच्या प्रारंभीचा शब्द बनला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराची दारे मोकळी करणे म्हणजे सर्व राष्ट्रांनी त्यांनी पूर्वी घातलेली व्यापारावरील सर्व नियंत्रणे काढून टाकणे आणि देशादेशात वस्तुंच्या, सेवांच्या भांडवलाच्या माहितीचा आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह मोकळेपणाने होऊ देणे. जागतिकीकरण या प्रक्रियेत सर्व देशांनी त्याच्या अंतर्गत आर्थिक व्यवस्थेमध्ये बदल करण्याचा समावेश आहे. या बरोबरच सर्व देशांनी जागतिक व्यापार यंत्रणेने आखून दिलेले अर्थव्यवस्थेचे नवीन धोरण स्वीकारावे की स्वीकारू नये हा प्रश्न आहे.

**प्रस्तावना : (Introduction)**

आंतरराष्ट्रीय व्यापार खुला झाला. याचा पहिला फटका भारतीय कृषिवर झाला. आंतरराष्ट्रीय बाजारात साखर, कापूस इत्यादी कृषि मालाच्या किंमती घसरल्या व त्याचा परिणाम देशांतर्गत कृषि मालाच्या किंमतीवर झाला. यामुळे सन 1997–1998 नंतरच्या काळात कृषिक्षेत्राचा व्यापार शर्ती (Terms of Trade) शेतकऱ्यांच्या विरोधात गेल्या. (याचा अर्थ शेतकऱ्यांनी विकत घेतलेल्या निविष्टांच्या किंमती व त्यांना मिळणारे कृषि उत्पन्न याचा निर्देशांक त्यांच्या विरोधात गेला) त्यांच्या नक्त उत्पनात सातत्याने घट होत गेली. व्यापार शर्तीची ही घट दरवर्षी साधारण 1.63 टक्के होती. अनेक शेतकऱ्यांना शेतीचा व्यवसाय तोट्याचा झाला. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने घेतलेल्या एका पाहणीनुसार भारतातील 40 टक्के शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय सोडून कोणतीही सरकारी नोकरी मिळावी असे म्हटले आहे. शेती संदर्भात गमावलेली विश्वासार्हता शेतकऱ्यांना परत मिळवून देणे हे काम प्राधान्याने व्हावयास हवे.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 223 : विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

**जागतिक व्यापार संघटना (WTO) :**

एप्रिल 1994 मध्ये गॅटच्या सदस्य राष्ट्रांनी मोरोक्कोमधील मर्राकेश या ठिकाणी एक करार समंत केला. या मराकेश कराराद्वारे गॅटच्या जागी एक नवी संघटना (WTO) ची स्थापना करण्यात आली. गॅट ही 1948 पासून जागतिक व्यापाराचे नियमन करणारी तात्पुरत्या स्वरूपाची संघटना होती. मात्र WTO ही आंतरराष्ट्रीय कराराने स्थापन करण्यात आलेली कायम स्वरूपी संघटना आहे. WTO चे मुख्यालय जीनिव्हा येथे आहे.

**WTO ची उद्दिष्ट्ये :**

(1) सदस्य राष्ट्रातील लोकांच्या जीवनमाचा दर्जा उंचावणे.
(2) पूर्ण रोजगार आणि परिणामकारक मागणीमध्ये वाढ घडवून आणने.
(3) वस्तुंचे उत्पादन आणि व्यापार वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
(4) जागतिक संसाधनांचा योग्य वापर होईल यासाठी प्रयत्न करणे.
(5) शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा स्वीकार.
(6) सेवांचे उत्पादन आणि व्यापार वाढीसाठी प्रयत्न करणे.
(7) पर्यावरण संवर्धन करणे.

**WTO ची पाश्वभूमी :**

30 ऑक्टोबर 1947 रोजी 23 देशांनी जीनिव्हा येथे आयात व्यापारावरील प्रशुल्क कर कमी करण्याच्या दृष्टीने एक करार केला तो करार म्हणजे गॅट करार. गॅट म्हणजे प्रशुल्क व व्यापारविषयक सामान्य करार (General Agreement on Tariff and Trade) हा करार 1 जानेवारी 1948 रोजी कार्यरत झाला. गॅट ही तात्पुरती व्यवस्था होती.

**गॅटच्या चर्चेच्या फेऱ्या :**

1947 ते 1993 या दरम्यान गॅटच्या ज्या बैठका झाल्या त्यांना राऊंडस असे म्हणतात. गॅट अंतर्गत असे 8 राऊंडस झाले. पहिला राऊंडस जीनिव्हा येथे सुरू झाला. पहिले सहा राऊंडस प्रशुल्क कमी करण्यासंबंधित होते. 7 व्या राऊंडसमध्ये प्रशुल्केत्तर अडथळ्याबाबत तसेच 8 वा राऊंडस या आधीच्या राऊंडपेक्षा वेगळा होता. ही फेरी ऊरग्वे देशाच्या पुंडाडेल ईस्टा या ठिकाणी 1986 रोजी सुरू झाली. या राऊंडस दरम्यान आंतरराष्ट्रीय व्यापारावरील प्रत्येक घटकावर म्हणजे अगदी सामान्य गोष्टीपासून विमानापर्यंत, बँकापासून दुरसंचारापर्यंत, औषधापासून सुती कापडापर्यंत चर्चा करण्यात आली. यावर सहमती न झाल्याने कोणताही करार होऊ शकला नाही. म्हणून गॅटच्या तत्कालिक महासंचालक आर्थर डंकेल यांनी स्वतःच एक विस्तृत प्रस्ताव तयार केला. त्यालाच डंकेल प्रस्ताव असे म्हणतात. 15 डिसेंबर 1993 रोजी त्याचे अंतीम कायद्यात रूपांतर करण्यात आले. ऊरूग्वे फेरी जीनिव्हा येथे संपुष्टात आली. 15 एप्रिल 1994 रोजी भारतासह 124 देशांनी या प्रस्तावावर सह्या केल्या. 12 डिसेंबर 1995 रोजी गॅट संपुष्टात आणण्यात आले. मात्र गॅटच्या आधी WTO ची स्थापना 1 जानेवारी 1995 रोजी करण्यात आली होती.

**जागतिक व्यापार संघटनेची कार्य :**

सदस्य राष्ट्रांना व्यापार आणि पशुल्काबद्दल भविष्यातील डावपेच आखण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे. तक्रार निवारणाशी संबंधित नियम आणि प्रक्रियांचे प्रशासन करणे, व्यापार धोरण परीक्षण व्यवस्थेशी संबंधीत नियम आणि तरतुदींची अमलबजावणी करणे.



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Special Issue 223 : विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

**WTO चे प्रशासन :**

WTO चे प्रशासन एका साधारण परिषदेमार्फत केले जाते. परिषदेमध्ये प्रत्येक सदस्य राष्ट्राचा एक कायम स्वरूपी प्रतिनिधी असतो. साधारणपणे दर महिन्याला तिची एक सभा जीनिव्हा येथे असते. WTO चे सर्वोच्च धोरण ठरविणारे प्राधिकरण म्हणजे मंत्रिस्तरीय परिषद होय. तीची दर दोन वर्षातून एकदा एक परिषद होते. सदस्य राष्ट्रांचा वाणिज्यमंत्री या परिषदेमध्ये सहभाग घेतो.

**जागतिक व्यापार संघटनेचे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने यष :**

भारत हा WTO चा संस्थापक सदस्य आहे. भारताचे सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करायला सुरुवात केली. भारताने परकीय गुंतवणुकीला मान्यता दिली. आयातीवरील बंधने दुर केली. फेरा सारख्या परकीय चलनावर नियंत्रण ठेवणारा कायदा रद्द केला. विनीमय दरात सुधारणा करून निर्यात वाढविण्याचा प्रयत्न केला.

**विश्वबाजारपेठ निर्माण झाली :**

WTO चा सर्वात मोठा फायदा म्हणजे संपूर्ण जग जवळ येवून विश्वबाजारपेठ निर्माण झाली. नवे तंत्रज्ञान स्वीकारून उद्योगांचे आधुनिकीकरण तत्पर व सुलभ झाले आहे. सर्व देशांची उत्पादकता व कार्यक्षमता वाढलेली आहे.

पीटर ड्रकर यांच्या मते, भावी समाज हा ज्ञानार्थी समाज आहे. दुरसंचार, इंटरनेट, पेजर्स, कॅम्प्युटर्स, ई–मेल यांनी माहिती तंत्रात क्रांती केली. यामुळे ज्ञान जगाच्या एका भागातून दुसऱ्या भागात वाहु लागले.

**नैसर्गिक संसाधनांचा पुरेपुर वापर :**

जागतिक व्यापारसंघटनेमुळे भारताला आपल्यात असणाऱ्या उत्पादन क्षमतेचा विकास होवून नैसर्गिक संसाधनाचा पुरेपूर वापर होवू लागला. उत्पादनाची मागणी वाढली ती पूर्ण करण्यासाठी उत्पादन वाढवावे लागेल.

**नवे तंत्रज्ञान हस्तांतराचा लाभ :**

जागतिक व्यापार संघटनेमुळे नवे तंत्रज्ञान हस्तांतरणाचा फायदा भारताला झाला. जगातील विविध राष्ट्रात, विविध प्रकारचे शोध लागत आहे. नवे तंत्रज्ञान एका देशातून दुसऱ्या देशात सहज जावू लागले. त्यामुळे भारताचा विकास जलद गतीने होत आहे.

**विदेषी भांडवल मिळू लागले :**

भारतीय अर्थव्यवस्थेला विविध प्रकारचा लाभ मिळून विदेशी भांडवल मोठ्या प्रमाणात मिळू लागले. उत्पादन वाढीला चालना मिळून विविध देशाशी व्यापार सुरू झाला. स्वदेशी उत्पादक आपला उत्पादन खर्च कमी करण्याचा दर्जा सुधारणाचा प्रयत्न करू लागले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे निर्यात वाढीला चालना मिळाली.

**उद्योगातील कार्यक्षमतेत वाढ झाली :**

WTO मुळे कुशल व्यवस्थापक कार्यक्षम तंत्र भारतात येवून त्याचा परिणाम भारतीय उद्योगातील कार्यक्षमता उत्पादकता वाढण्यास मदत झाली.

**लोकांच्या प्रवृत्तीत बदल :**

विश्व व्यापारामुळे देशातील लोकांच्या प्रवृत्तीत बदल झाले. पाश्चिमात्य देशातील विविध वस्तुंच्या आयातीने भारतातील अनेक लोकांच्या आयुष्यात आमुलाग्र बदल झाले. अनेक नवीन वस्तु आल्याने जून्या वस्तू कालबाह्य ठरल्या. चीन सारख्या साम्यवादी देशातील स्त्री–पुरुष पाश्चिमात्य

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Special Issue 223 : विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

कपड्यांचे अनुकरण करू लागले. विदेशी वस्तू वापराचे फॅड निर्माण झाले. सकारात्मक बदल लोकांच्या प्रवृत्तीत घडून आले.

**आर्थिक विकासाला प्रेरणा मिळाली :**

मुक्त व्यापार आणि गुंतवणुकीने जगातील सर्व देशांच्या आर्थिक विकासाला प्रेरणा प्राप्त झाली. तसेच अविकसीत देशांना याचा फायदा झाला. तेथील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला. जीवनमान उंचावले अर्थात भारतात मुक्त व्यापाराच्या नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रभावाखाली न येता, तंत्र व विज्ञान उत्पादक आर्थिक व्यापता यामध्ये स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारून आर्थिक विकास साधता आला.

**इतर लाभ :**

भारताचा मुक्त व्यापाराने मोठ्या प्रमाणात फायदा झाला. जसे औषध निर्मितीक्षेत्र व वस्त्रोद्योग क्षेत्र, कृषीक्षेत्र इत्यादी क्षेत्रात भारताची मोठ्या प्रमाणात निर्यात क्षमता अजून वाढविण्यासाठी त्यात बरीच वाढ केली पाहिजे. त्यासाठी निर्यातीवरील नियंत्रणे कमी करणे, जकात दरात कपात करणे, उत्पादकतेत वाढ करणे, मालाचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे. सोबतच माहिती तंत्रज्ञानामुळे व दळणवळणामुळे जग लहान होत आहे. यामुळे भारताला WTO चे धोरण स्वीकारावेच लागेल.

**जागतिक व्यापार संघटनेचे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अपयष :**

जागतिक व्यापार संघटनेचा भारताच्या दृष्टीने विचार केला तर कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडण्याची शक्यता आहे. कृषि सिंचन क्षेत्राकडे दुर्लक्ष झाले, कृषि क्षेत्राला घटता विज पुरवठा, कृषि निविष्टीच्या वाढत्या किंमती, कृषि क्षेत्रातील वाढती जोखीम तसेच भारतीय उद्योग बहुराष्ट्रीय कंपन्याच्या स्पर्धेत टिकू शकणार नाही. एवढेच नव्हे तर आरोग्य, शिक्षण, रस्ते, पाणी, वीज या सारख्या मुलभूत सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक असून त्यावर WTO चा प्रतिकूल परिणाम होत आहे. या सोयीशिवाय विकासाची प्रक्रिया गतिमान होणार नाही. परकीय गुंतवणूकीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. भारतातील नोकरशाहीवृत्ती, दप्तर दिरंगाई, सरकारी नियंत्रण, भ्रष्टाचार, राजकीय अस्थिरता इत्यादीमुळे गुंतवणुकीस अडथळे निर्माण झालेले आहेत. नवीन तंत्रज्ञानामुळे बेकारी देखील वाढत आहे.

असे दोष जरी जागतिक व्यापार संघटनेमुळे निर्माण झाले तरी अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी उत्पादन वाढ, उत्पादकता, गुणवत्ता वाढीसाठी उत्पादक घटक तंत्रज्ञान यांचे स्थलांतरण करण्यासाठी तसेच अर्थव्यवस्थेत गतिशिलता निर्माण करण्यासाठी मुक्त व्यापार आणि जागतिक व्यापार संघटनेचे महत्व नाकारता येत नाही.

**संदर्भ सूची :**

1. अर्थसंवाद जुलै–सप्टेंबर 2013, खंड–37, अंक 2
2. प्रा. चव्हाण एन.एल. (2009), 'भारतीय अर्थव्यवस्था' प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
3. प्रा. रायखेलकर, डॉ. दामजी (2013), 'भारतीय अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
4. डॉ. देशपांडे ज्योत्स्ना (2011), 'विकासाचे अर्थशास्त्र', पिंपळापुरे अॅन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
5. डॉ. कवीमंडल विजय (2012), 'कृषि व ग्रामीण अर्थशास्त्र', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
6. मिश्रा, पुरी (2012), 'भारतीय अर्थव्यवस्था' हिमालय पब्लिकेशन हाऊस.
7. डॉ. झोळे ना.य. (1997), 'उदारीकरण नवे आर्थिक धोरण', विद्या प्रकाशन, नागपूर
8. रूद्र दत्त, के.पी.एम. सुन्दरम (2012), 'भारतीय अर्थव्यवस्था', एस. चॉन्द पब्लिकेशन, न्यु दिल्ली.
9. Loksatta Marathi News App.



Scanned with OKEN Scanner